माहिती हवीय?

रमेश राजाराम कांबळे, उस्मानाबाद

□ **पहिला प्रदर्शित मराठी चित्रपट कोणता? दिग्दर्शक आणि नायक-नायिका कोण? तो किती साली प्रदर्शित झाला?**

— १९३२चा प्रभातचा *अयोध्येचा राजा* मराठीतला पहिला बोलपट. ६ फेब्रुवारी १९३२ला तो मुंबईच्या मॅजेस्टिक सिनेमात प्रदर्शित झाला होता. यां बोलपटाच्या आधी मराठीत एक बोलपट आला होता. मास्टर आणि कंपनीचा *संत तुकाराम* आणि तो *अयोध्येचा राजाच्या* आधी ३० जानेवारी १९३२ला पुण्याच्या आर्यन सिनेमात प्रकाशित झाला होता. तरीही या चित्रपटाला मराठीतल्या पहिल्या बोलपटाचा दर्जा दिला जात नाही. कारण हा चित्रपट म्हणजे एक नाटक होते. आणि रंगभूमीवर नाटकाचा प्रयोग चालू ठेवून या चित्रपटात त्या नाटकाचे कॅमेऱ्याने चित्रण करण्यात आले होते. *अयोध्येचा राजा* चित्रपट तंत्राने चित्रण करण्यात आलेला मराठीतला पहिला बोलपट. *संत तुकाराम*चे दिग्दर्शक होते बाबाजीराव राणे. नायक-नायिका पुरुषोत्तम वामन शुक्ल, येसूबाई पुणेकर, *अयोध्येचा राजा*चे दिग्दर्शक व्ही. शांताराम, नायक-नायिका गोविंदराव टेंबे, दुर्गा खोटे.

□ **मधु कपूरचा राज कपूरच्या घराण्याशी काही संबंध आहे का?**

— नाही. केदार कपूर नामक एक दिग्दर्शक पन्नास व साठच्या दशकात हिंदी चित्रपटात होते. *मिस बॉम्बे, चंगेजखान, मिलन* यासारख्या काही हिंदी चित्रपटाचं दिग्दर्शन त्यांनी केलं होतं. मधु कपूर त्यांची कन्या.

यशवंत दुधे, लिंब.

□ **मराठीवरून हिंदीत निर्माण झालेले चित्रपट कोणकोणते?**

— *बाराती* (*लग्न पहावं करून*), *मेरा मुन्ना* (*पहिला पाळणा*), *आंटी नं. १* (*मोरुची मावशी*), *घरबार* (*राम राम पाव्हणं*), *जीवनज्योती* (*बाळा जो जो रे*), *चाचा चौधरी* (*पेडगावचे शहाणे*), *तन्हाई* (*दूध भात*), *भाभी की चुड़ियां* (*वहिनीच्या बांगड्या*), *स्कूल मास्टर* (*ऊन-पाऊस*), *एक दिल सौ अफसाने* (*गंगेत घोडं न्हालं*), *औरत यह तेरी कहानी* (*स्त्री जन्मा ही तुझी कहाणी*), *नॉटी बॉय* (*दोन घडीचा डाव*), *डॉ. विद्या* (*शिकलेली बायको*), *हॉलीडे इन बॉम्बे* (*याला जीवन ऐसे नाव*), *मैं शादी करने चला* (*अवघाची संसार*), *बहूबेटी* (*कन्यादान*), *मान अपमान* (*मानिनी*), *मेरा साया* (*पाठलाग*), *लव्ह मॅरेज* (*मधुचंद्र*), *पिया का घर* (*मुंबईचा जावई*), *दो हवालदार* (*पांडू हवालदार*) यासारखे अनेक मराठी चित्रपट आतापर्यंत हिंदीत निर्माण झाले आहेत.

□ **हिंदी चित्रपटातली पहिली मराठी अभिनेत्री कोण?**

— दुर्गा खोटे. बोलपटांच्या आगमनानंतर *ट्रॅप्ड* या हिंदी बोलपटात भूमिका करून आपल्या रुपेरी जीवनाची सुरुवात त्यांनी केली.

संदीप राणे, घोणसरी.

□ **मीनाक्षी शिरोडकर यांनी मराठीबरोबर हिंदी चित्रपटातदेखील भूमिका केलीय का? त्यांचे हिंदी चित्रपट कोणते?**



*ब्रह्मचारी*मध्ये मीनाक्षी शिरोडकर

— १९३८चा *ब्रह्मचारी* हा मीनाक्षीबाईंचा पहिलाच चित्रपट हिंदी-मराठी होता. त्यानंतर त्यांनी *ब्रँडी की बोतल, मेरा हक, घर की रानी, अमृत, कंगन, रामशास्त्री, बडी माँ, पन्नादाई सुभद्रा* या हिंदी चित्रपटांत भूमिका केल्या. या चित्रपटांपैकी *बडी माँ, पन्नादाई सुभद्रा* हे त्यांचे तीन चित्रपट फक्त हिंदीत होते. बाकीचे चित्रपट हिंदी व मराठीत.

□ **'या चिमण्यांनो परत फिरा...' हे गाणं कोणत्या चित्रपटातील? गीतकार कोण? ते कोणावर चित्रित करण्यात आलंय?**

— ग. दि. माडगूळकरांनी लिहिलेलं हे गाणं *जिव्हाळा* या चित्रपटात जयश्री गडकर यांच्यावर चित्रित करण्यात आलं होतं.

रविकांत साखरे, जामखेड.

□ **दोस्त, गुमराह, सरगम, डॉक्टर, कहीं प्यार न हो जाये, यहुदी की लडकी, सैलाब या चित्रपटातील नायक-नायिका कोण? संगीतकार कोण?**

— दोस्त या नावचा चित्रपट तीनदा आला. पहिला १९४४ला, नायक-नायिका मोतीलाल-नूरजहाँ, संगीतकार सज्जाद हुसेन, दुसरा दोस्त १९७४ला, नायक-नायिका धर्मेंद्र-हेमामालिनी, संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल. तिसरा दोस्त १९८९ला, नायक-नायिका मिथुन-अमला, संगीतकार आर.डी.बर्मन. *गुमराह* या नावचा चित्रपट तीनदा आला. १९६३ला पहिला, नायक अशोककुमार-सुनील दत्त, नायिका माला सिन्हा, संगीतकार रवी. १९७७ला दुसरा *गुमराह*, नायिका-नायिका सुभाष घई-रीना रॉय, संगीतकार उषा खन्ना. १९९३ला तिसरा *गुमराह*, नायक-नायिका संजय दत्त-श्रीदेवी, संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल. *कहीं प्यार न हो जाये* १९६३ला आला होता. नायक-नायिका मेहमूद-शकीला, संगीतकार कल्याणजी-आनंदजी. *सरगम* दोनदा आला होता. १९५०ला पहिला, नायक-ना राज कपूर-रेहाना, संगीतकार सी. रामचंद्र. १९७९ला दुसरा सरगम, नायक-नायिका राज कपूर जया प्रदा, संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल. डॉक्टर १९४१ला आला होता. नायक-संगीतकार पंकज मलिक, नायिका भारतीदेवी. *यहुदी की लडकी* दोनदा आला होता. पहिला १९३३ला, नायक-नायिका के. एल.सायगल, रतनबाई, संगीतकार पंकज मलिक, १९५७ला दुसरा यहुदी की लडकी, नायक-नायिका प्रदीपकुमार-मधुबाला, संगीतकार रवी. *सैलाब*ही दोनदा आला. १९५६ला पहिला, नायक-नायिका अभी भट्टाचार्य-गीताबाली, संगीतकार मुकुल रॉय. दुसरा *सैलाब* १९९०ला नायक-नायिका आदित्य पंचोली-माधुरी दीक्षित, संगीतकार भप्पी लहरी.

मेघा कदम, वैभववाडी.

□ **लक्ष्मीकांत प्यारेलाल या जोडीचा पहिला चित्रपट कोणता होता? त्याचे दिग्दर्शक कोण? तो किती साली प्रदर्शित झाला?**

— छैलाबाबू लक्ष्मीकांत-प्यारेलाल या जोडीचा पहिला चित्रपट. पण तो अनेक वर्षे रखडला. आणि त्यानंतर त्यांनी स्वीकारलेला पारसमणी पडद्यावर येणारा त्यांचा पहिला चित्रपट ठरला. १९६३ला तो पडद्यावर आला होता व छैलाबाबू १९६७ला. पारसमणीचे दिग्दर्शक होते बाबूभाई मिस्त्री व छैलाबाबूचे दिग्दर्शक के.परवेज. १९६७च्या छैलाबाबूनंतर लक्ष्मीकांत-प्यारेलालनी १९७७ला छैलाबाबू या नावाच्या आणखी एका चित्रपटाला संगीत दिलं होतं. ●